निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २५१ वा.
शनिवार : १५ नोव्हेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंडे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## '....आम्ही मान्य केलं पाहिजे', सुप्रिया सुळे बिहारमधील निकालावर स्पष्टच बोलल्या, 'हा एकतर्फी निकाल...'




**बिहार**/ नितीश कुमार यांचं मनापासून अभिनंदन. त्यांच्या आघाडीने चांगलं काम केलं हे आम्ही मान्य केलं पाहिजे असं सुप्रिया सुळेंनी म्हटलं आहे. एकतर्फी, इतक्या मोठ्या प्रमाणात जिंकतील असं मीडिया, सर्व्हेंना किंवा जिंकणाऱ्यांनाही वाटत आहे. आम्हाला याचा अभ्यास करावा लागेल. नितीश कुमार यांचा विजय आहे हे मान्य करावं लागेल असं त्यांनी स्पष्टच म्हटलं आहे. मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या.

नितीश कुमार यांचं मनापासून अभिनंदन. त्यांच्या आघाडीने चांगलं काम केलं हे आम्ही मान्य केलं पाहिजे. बिहारच्या लोकांनी नितीश कुमार यांच्यावर विश्वास दाखवला आहे. हे यश नितीश कुमार यांचं आहे. पूर्ण निकाल अजून यायचा आहे. आम्ही आत्मचिंतन केलं पाहिजे. आम्हाला आता बघायला पाहिजे की आमच्याकडून कोणत्या चुका झाल्या. एकतर्फी निकाल लागेल असं वाटत नाही. मतविभाजन कसे झाले याचा अभ्यास २ ते ३ दिवसात करु असं सुप्रिया सुळेंनी सांगितलं आहे.

यशाचे अनके बाप असतात, पण पराभवाला कोणी वाली नसतं असंही यावेळी त्या म्हणाल्या.

राहुल गांधींनी प्रचंड मेहनत केली. राहुल स्टार प्रचार होते. राहुल गांधी यांच्या सभेनंतर फॉलो अप किती केले हे माहिती नाही. कार्यकर्त्यांनी किती काम केले माहिती नाही.

आपण आत्मचिंतन केले पाहिजे. निकालांनंतर त्याचा अभ्यास हा केलाच पाहिजे. मतविभाजनामुळे हा फटका बसला आहे का हे बघाव लागेल. या विषयी मी काँग्रेससोबत आणि तेजस्वींसोबत देखील चर्चा करेन. या निवडणुकीत स्टार प्रचारक आणि चेहरा नितीश कुमार होते. हे यश त्यांचे आहे. महाराष्ट्रात मुख्यमंत्री पदाबाबत जे झाले ते तिकडे होईल असं वाटत नाही कारण दोन्ही राज्यात परिस्थिती वेगळी आहे असंही त्यांनी म्हटलं.

## '...गर्दा उड़ा दिया', बिहारमधील ऐतिहासिक विजयानंतर PM मोदींचं गमछा फिरवत सेलिब्रेशन...

**नवी दिल्ली**/ 'बिहार के लोगों ने गर्दा उड़ा दिया' अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी बिहारमधील एनडीएच्या ऐतिहासिक विजयावर प्रतिक्रिया दिली आहे. नरेंद्र मोदींनी दिल्लीतील भाजपा मुख्यालयात कार्यकर्ते, समर्थकांसोबत संवाद साधला. जेपी नड्डा, राजनाथ सिंह आणि अमित शहा यांच्यासह अनेक वरिष्ठ भाजप नेते यावेळी उपस्थित होत. नरेंद्र मोदींनी भाजपा मुख्यालयात पोहोचतात हातात गमछा घेऊन भिरकावत आनंद साजरा केला.

पुढे त्यांनी म्हटलं की, २०१० नंतर बिहारने एनडीएला सर्वात मोठा जनादेश दिला आहे. सर्व एनडीए पक्षांच्या वतीने, मी बिहारच्या महान लोकांचे नम्रपणे आभार मानतो. मी बिहारच्या महान लोकांना आदरपूर्वक नमन करतो. बिहारमधील काही पक्षांनी तुष्टीकरणाचा चध त्रींींश्र फॉर्म्युला तयार केला होता. पण आजच्या विजयाने एक नवीन, सकारात्मक चध फॉर्म्युला दिला आहे, आणि तो म्हणजे - महिला आणि युथ.

आज, बिहार हे देशातील सर्वात जास्त तरुण लोकसंख्या असलेल्या राज्यांपैकी एक आहे आणि यामध्ये प्रत्येक धर्म आणि जातीतील तरुणांचा समावेश आहे. त्यांच्या इच्छाशक्तीने, त्यांच्या आकांक्षांनी आणि त्यांच्या स्वप्नांनी जंगल राजच्या जुन्या आणि सांप्रदायिक चध फॉर्म्युलाला उध्वस्त केलं आहे. मी आज बिहारच्या तरुणांचं विशेषतः अभिनंदन करतो. बिहार निवडणुकीने आणखी एक गोष्ट सिद्ध केली आहे की आता, देशातील मतदार, विशेषतः आपले तरुण मतदार, मतदार यादी शुद्धीकरणाला खूप गांभीर्याने घेतात. बिहारमधील तरुणांनीही मतदार यादीच्या शुद्धीकरणाला जोरदार पाठिंबा दिला आहे, असंही त्यांनी सांगितलं.

आता प्रत्येक पक्षाची जबाबदारी आहे की त्यांनी मतदान केंद्रांवर आपापल्या पक्षांना सक्रिय करावे आणि उत्साहाने मतदार यादी शुद्धीकरणाच्या कामात सहभागी व्हावे आणि १०० 'टक्के योगदान द्यावे, जेणेकरून इतर ठिकाणीही मतदार यादी शुद्धीकरण साध्य करता येईल.



बिहार ही अशी भूमी आहे ज्याने भारताला लोकशाहीची जननी म्हणून सन्मान दिला. आज त्याच भूमीने लोकशाहीवर हल्ला करणाऱ्या शक्तींना पराभूत केले आहे. बिहारने पुन्हा एकदा असत्याचा पराभव होतो आणि जनतेचा विश्वास जिंकतो हे दाखवून दिलं आहे. बिहारने स्पष्टपणे सांगितले आहे की जनता जामिनावर बाहेर असलेल्यांना पाठिंबा देणार नाही, असंही त्यांनी ठणकावून सांगितलं.

## वडिलांसाठी केलेला नवस फेडायला गेलेल्या कुटुंबावर काळाचा घाला, नवले पुलाच्या अपघातात एकाच कुटुंबातील ५ जणांचा मृत्यू

**पूणे** / पुण्याच्या नवले पुलावर गुरुवारी संध्याकाळी भीषण अपघात झाला. या अपघातात दोन ट्रकच्या मधोमध एक कार सापडल्याने मोठा अपघात झाला. या अपघातात पाच जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. यामध्ये तीन वर्षांच्या चिमुकल्याचा मृत्यू झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कारमधील प्रवासी मयत स्वाती संतोष नवलकर, वय ३७ वर्ष, शांता दत्तात्रय दाभाडे वय ५४ वर्ष, दत्तात्रय चंद्रकांत दाभाडे वय ५८ वर्षे या एकाच कुटुंबातील तीन जणांचा मृत्यू झाला आहे. तर त्यांच्यासोबत ३ वर्षींची त्यांच्या शेजारी राहणारी मुलगी मोक्षिता हेमकुमार रेड्डी होती. ही मुलीग आपल्या आईच्या मैत्रिणीसोबत फिरायला गेली होती. तिने देखील या अपघातात आपले प्राण गमावेल आहे.

नवलकर कुटुंबातील व्यक्तीने दिलेल्या माहितीनुसार, स्वाती नवलकर यांच्या वडिलांना पक्षाघाताचा झटका आला होता. यामधून ते सुखरुप वाचावेत आणि चालू लागावेत यासाठी त्यांनी ५ गुरुवार केले होते. अपघात झाला तो शेवटचा पाचवा गुरुवार होता. त्या नारायणपुरवरुन दत्तांचे दर्शन घेऊन घरी परतत होते. त्याच दिवशी त्यांच्या मुलीचा देखील वाढदिवस होता. अशातच त्यांच्या अपघाताचा बातमी समोर आली.

### ट्रक चालकाचा मृत्यू

धनंजय कुमार कोळी वय तीस वर्ष राहणार सोनवणे वस्ती चिखली पुणे मुळगाव जयसिंगपूर कोल्हापूर येथील आहेत. हा अपघात एवढा भीषण होता हे त्याच्या समोर येणाऱ्या फोटो आणि व्हिडीओंमधून पाहता येऊ शकते.

### कुठे घडला हा अपघात?

पुण्यातील नवले पुलावर जवळपास ८ लोकांचा मृत्यू झाला आहे. ज्यामध्ये २० जण जखमी झाले आहे. अनियंत्रित ट्रक जवळपास २० वाहनांना टक्कर देत हा अपघात झाला. हा अपघात इतका भीषण होता की, यामध्ये दोन ट्रकमध्ये एक कार चिरडली आहे. ज्या कारने पेट घेतला ज्यामध्ये एकाच कुटुंबातील ५ जणांचा मृत्यू झाला.

### बर्निंग ट्रकचा थरार

वृत्तानुसार, साताराहून मुंबईला जाणाऱ्या राजस्थान नोंदणी क्रमांकाच्या



एका भरलेल्या ट्रकचे अचानक नियंत्रण सुटले. ट्रक सुमारे एक किलोमीटरपर्यंत धावत राहिला आणि वाटेत कंटेनर, टेम्पो, मिनीबस, कार, दुचाकी आणि इतर अनेक लहान वाहनांना धडकला. असे मानले जाते की पुलावर ट्रकचे ब्रेक निकामी झाले, ज्यामुळे चालकाचे नियंत्रण सुटले.

## देवेंद्र फडणवीसांनी प्रचार केलेल्या 'त्या' ७ मतदारसंघात काय निकाल लागला?



**बिहार** / बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपाला मोठं यश महाराष्ट्राचे देवाभाऊ बिहारी जनतेला भावले प्रचार केलेल्या सातही मतदारसंघात भाजपाला फायदा बिहार विधानसभा निवडणुकीत एनडीएला मोठं यश मिळालं आहे. भाजपनं ९० हून अधिक जागी विजय मिळवला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीच विजयाचे शिल्पकार मानले जातात. मात्र यात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. त्यांनीही या निवडणुकीत प्रचार केला आणि बिहारी जनतेला साद घातली होती. त्याचं फळही भाजपाला मिळालं आहे. महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत भाजपाला आणि महायुतीच्या विजयाचे शिल्पकार ठरले ते देवेंद्र फडणवीस. दूरदृष्टी, धोरणी आणि योग्य नियोजन, जनतेला विकासाच्या मार्गावर नेणारे हेच देवाभाऊ बिहारी जनतेलाही भावले. बिहार विधानसभा निवडणूक जिंकायचीच, या इराद्यानं भाजपानं कंबर कसली होती. भाजपाची अनेक धुरंधर नेतेमंडळी या प्रचारात दिसली. यात महत्त्वाचं नाव होतं देवाभाऊंचं. बिहारच्या सात जिल्ह्यांमधल्या ६१ मतदारसंघांमध्ये देवेंद्र फडणवीसांनी प्रचाराची धुरा सांभाळली, सभा घेतल्या, रॅली काढल्या आणि या सातही मतदारसंघात एनडीएच्या उमेदवारांना फायदा झाला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी प्रचार केलेले मतदारसंघ

सारन ,सिवान ,पाटणा , मुझफ्फरपूर, सहरसा महाराष्ट्राच्याच नाही तर राष्ट्रीय स्तरावरच्या राजकारणातलं देवाभाऊ चलनी नाणं बनलं आहे. मुख्य म्हणजे जनताही त्यांच्यावर विश्वास ठेवतेय, हेच बिहारच्या विधानसभा निकालातूनही स्पष्ट झालं आहे.

## पालकांना सावध करणारी बातमी! तिसरीतील विद्यार्थ्याकडून घृणास्पद प्रकार ....

**लातूर** / लातूर जिल्ह्यात एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. टिव्ही, स्मार्टफोन यांचा वाढता वापर यामुळं शाळकरी मुलांचे वर्तन बिघडत चालले आहे. मुलं चुकीच्या मार्गाला लागले आहेत. लातूरमध्ये समस्त पालकांना हादरवणारी एक घटना घडली आहे. दोन शाळकरी मुलांच्या वर्तनामुळं एकच खळबळ उडाली आहे.

लहान मुलंही मोबाईलच्या आहारी गेले आहेत. आता अत्यावश्यक गरजांमध्ये मोबाईलचा समावेश आहे. मात्र मोबाईलमध्ये मुलं काय बघतात? त्यांचे काय सुरू आहे? यावर पालकांनी लक्ष ठेवणे गरजेचे आहे. लातूरमध्ये जी घटना घडली आहे, ती पालकांची चिंता वाढवणारी आहे. इयत्ता तिसरीत शिकणाऱ्या दोन विद्यार्थांनी केलेला घृणास्पद प्रकारामुळं एकच गोंधळ उडाला आहे.

तिसरीच्या वर्गात शिकणारा विद्यार्थी त्याचे वयच साधारण ८-९ वर्षे असेल. या वयात अभ्यास, खेळणे आणि दंगा करण्याचे सोडून या विद्यार्थ्यांनी वर्गमित्रावरच अश्लील व्हिडिओ पाहून अनैसर्गिक अत्याचार केल्याचा प्रयत्न केला आहे. या घटनेने पालकही भेदरले असून शाळा प्रशासनातही खळबळ उडाली आहे. गुरुवारी ही घटना उघडकीस आली आहे.

लातूर शहराजवळ असलेल्या एका सरकारी शाळेतच ही घटना घडली आहे. तिसरीमध्ये शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याने सोशल मीडियावर एक अश्लील व्हिडीओ बघितला. शाळेतील वर्गात तो होता. अश्लील व्हिडिओ पाहून त्याने वर्गमित्रावरच अनैसर्गिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. ही घटना जेव्हा शिक्षकांना कळली, तेव्हा तेही हादरून गेले. विद्यार्थ्याची विचारपूस केल्यानंतर त्याने सोशल मीडियावर व्हिडीओ बघितल्याचे आणि ते बघून असे करण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले. या घटनेने शाळेत खळबळ उडाली. शिक्षक आणि पालकांनीही धक्का बसला आहे.




### बारा वर्षीय मुलीवर अत्याचार करणाऱ्या शिक्षकास मरेपर्यंत जन्मठेप

सोलापुरात बारा वर्षीय मुलीवर अत्याचार करणाऱ्या शिक्षकास मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली असून दोन वर्षांनी निकाल लागला आहे. सोलापूर जिल्हा आणि सत्र न्यायालयाचे न्यायाधीश डी एन सुरवसे यांनी शिक्षकाला मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. धनाजी सोपान इंगळे असं मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा झालेल्या शिक्षकाचे नाव असून शाळेत गेलेल्या पीडीतेवर १४ एप्रिल २०२३ रोजी शिक्षक आरोपी इंगळे याने अत्याचार केला होता. सदर प्रकरणात चार ते पाच पीडित विद्यार्थिनीवर अत्याचार केल्याची तक्रार समोर आली होती.

## बिहारमध्ये काँग्रेसचा सुपडासाफ! दोनअंकी आकडा गाठणही झालं अशक्य

बिहार विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा सुपडासाफ झालाय. महाआघाडीच्या जागावाटपात काँग्रेसच्या वाट्याला ४३ जागा आल्या. मात्र बिहारमध्ये काँग्रेसला विजयाचा दुहेरी आकडाही गाठता आला नाही. २०२० च्या निवडणुकीच्या निकालाच्या आसपासही काँग्रेसला पोहोचता आलेलं नाहीय. बिहार विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचं काय चुकलं याची चर्चा आता जोरदार सुरू झालीय.

संपूर्ण देशाचं लक्ष लागलेल्या बिहार विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहिर झालाय. बिहारच्या जनतेनं पुन्हा एकदा एनडीएच्या पारड्यात आपला कौल टाकलाय. तर महाआघाडीला पराभवाचा सामना करावा लागलाय. महाआघाडीतील महत्वाच्या दोन्ही पक्षांचीही कामगिरी सुमार अशीच राहिलीय. आरजेडीला सुद्धा अपेक्षित यश मिळालं नाही. तर बिहारमध्ये काँग्रेसला पराभवाचा मोठा धक्का सहन करावा लागला. काँग्रेसने ४३ जागांवर आपले उमेदवार उभे केले होते. मात्र काँग्रेसला विजयाचा दुहेरी आकडाही गाठता आला नाही. आता बिहारमधील काँग्रेसच्या पराभवानंतर राज्यातलं राजकारणही तापल्याचं पाहायला मिळतंय.. बिहारमधील या निवडणुका पारदर्शक झाल्या नसल्याचा आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केलाय.

काँग्रेसचा मतचोरीच्या फेक नरेटीव्हला बिहारच्या जनतेनं नाकारल्याचं म्हणत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेसवर पलटवार केलाय. तर काँग्रेसने




पराभवाचं चिंतन करावं असा सल्लाही बावनकुळेंनी काँग्रेसला दिलाय. काँग्रेसने बिहारमध्ये गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न केला मात्र त्यातच त्यांची वाताहत झाल्याची टीका शिवसेना खासदार नरेश म्हस्के यांनी केलीय.

दरम्यान ठाकरेंच्या शिवसेनेचे नेते अंबादास दानवे यांनी बिहारच्या पराभवानंतर मित्रपक्ष असलेल्या काँग्रसला टोला लगावलाय. काँग्रेसने पराभवातून शिकायला हवं. काँग्रेसने महाराष्ट्रात केली तीच चूक बिहारमध्ये केल्याचं म्हणत दानवेंनी काँग्रेसला लक्ष्य केलं. तर महाराष्ट्राच्या विधानसभा पराभवाला सर्वच जबाबदार असल्याचं म्हणत विजय वडेट्टीवारांनी दानवेंना प्रत्युत्तर दिलंय.

बिहारमधील काँग्रेसच्या पराभवाचे पडसाद राज्याच्या राजकारणातही उमटायला सुरूवात झालीय.

राज्यातील सत्ताधाऱ्यांनी बिहारच्या पराभवानंतर काँग्रेसला लक्ष्य केलंय. तर दुसरीकडे मित्रपक्षांनीही टोला लगावलाय. आता राज्यातीस स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपचा आत्मविश्वास दुणावणार यात शंका नाही. मात्र आता महापालिकांमध्ये स्वबळाची चाचपणी करणारी काँग्रेस बिहार निकालानंतर काय निर्णय घेणार हे पाहणं हे महत्वाचं ठरणार आहे.

# जननायक बिरसा मुंडा

आज १५ नोव्हेंबर, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांची जयंती. जननायक बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी रांची जवळील लिहती या खेडेगावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सुगमा मुंडा तर आईचे नाव करमी हातू असे होते. त्यांचे वडील शेतमजूर होते. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांना इंग्रजी माध्यमाच्या चाईबासा इंग्लिश मिशनिरी स्कुलमध्ये शिक्षणाची संधी मिळाली. इंग्रजी शिक्षणामुळे त्यांच्यावर आधुनिक विचारांचा प्रभाव पडला. बिरसा मुंडा हे जरी इंग्रजी शाळेत शिकत असले तरी त्यांना भारतीय संस्कृतीचा अभिमान होता. १८७८ - ७९ मध्ये ब्रिटिशांनी वन कायद्यात बदल केला. या नव्या कायद्यानुसार आदिवासींच्या ताब्यात असलेल्या जंगलांवर ब्रिटिशांची मालकी झाली. या कायद्यामुळे आदिवासींवर बेघर होण्याची वेळ आली. आदिवासींनी उदरनिर्वाहासाठी फळे, कंदमुळे, लाकुडफाटे अथवा जनावरांसाठी चारा तोडल्यास त्यांना शिक्षा होऊ लागली आणि आदिवासींच्या आस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला. या कायद्या विरोधात आदिवासींनी न्यायालयात दाद मागितली पण तिथेही त्यांना न्याय मिळाला नाही. १८८४ साली बिहारमध्ये भीषण दुष्काळ पडला. भीषण दुष्काळ आणि उपासमारीने अनेक लोक मरण पावली. जननायक बिरसा मुंडा यांनी या काळात आदिवासी समाजाची निःस्वार्थ सेवा केली. भीषण दुष्काळात लोक उपासमारीने मरत असताना लोकांप्रति संवेदना व्यक्त करण्याऐवजी जुलमी ब्रिटिश सरकारने अवाजवी शेतसारा आकारला. ब्रिटिशांनी आकारलेल्या अवाजवी शेतसाऱ्याला जमीनदार आणि जहागिरदारांनी पाठिंबा दिला त्यामुळे चिडलेल्या बिरसा मुंडा यांनी जनआंदोलन उभारले. हे जनआंदोलन जहागीरदार व जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध होते. आदिवासी बांधव मोठ्या संख्येने या जनआंदोलनात सहभागी होऊ लागल्याने हे आंदोलन दडपण्यासाठी जहागीरदार आणि जमीनदारांच्या माध्यमातून ब्रिटिशांनी बिरसा मुंडा यांना रोखण्याचा प्रयत्न केला. १८८५ साली बिरसा मुंडा यांना दोन वर्ष कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना हजारीबागच्या तुरुंगात पाठवण्यात आले. तुरुंगात असतानाच त्यांनी जुलमी ब्रिटिश सरकार उखडून टाकण्याचा संकल्प केला. दोन वर्षांची शिक्षा भोगून आल्यावर त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून ब्रिटिश सरकार विरुद्ध लढा पुकारला. १८८७ मध्ये बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने ब्रिटिशांविरुद्ध अनेक लढाया करून त्यांना जेरीस आणले. या लढाया त्यांनी पारंपरिक शस्त्रांनी म्हणजे भाले, तलवारी, धनुष्यबाण यांच्या साहाय्याने लढल्या. आदिवासी, दुर्गम, डोंगराळ भागातून पारंपरिक पद्धतीने लढा उभारून त्यांनी ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले. बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखालील आदिवासी समाज आपल्याला दाद देत नाही हे लक्षात आल्यावर ब्रिटिशांनी अतिरिक्त ८ कुमुक मागवली आणि आदिवासींवर हल्ला केला त्यात ४०० आदिवासी बांधव शहीद झाले. तरीही बिरसा मुंडा यांनी हार मानली नाही त्यांनी आपली लढाई चालूच ठेवली. १८९० मध्ये बिरसा मुंडा डोमवाडी पहाडात आदिवासी बांधवांना मार्गदर्शन करत असताना ब्रिटिश सैन्याने त्यांच्यावर हल्ला केला. भीषण लढाई झाली. बिरसा मुंडा यांना अटक करून रांचीच्या कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली. २० मे १९०० रोजी त्यांना एकांत कोठडीत ठेवण्यात आले.एकांत कोठडीत जेवण करण्यास त्यांनी नकार दिला त्यामुळे त्यांना अशक्तपणा आला. न्यायालयातच ते बेशुद्ध पडले. त्यांना न्यायालयातून कारागृहात आणण्यात आले औषध उपचार करण्यात आले त्यांची तब्येत सुधारली मात्र ९ जून १९०० रोजी त्यांना रक्ताची उलटी झाली ते बेशुद्ध पडले व त्यातच त्यांची प्राणज्योत माळवली. त्यांचा मृत्यू एशियाटिक कॉलरा या आजाराने झाला असे सरकारच्या वतीने सांगण्यात आले असले तरी त्या आजाराची कोणतेही लक्षणे त्यांच्या शरीरावर दिसत नव्हते त्यामुळेच इतिहासकार ब्रिटिशांनी त्यांची हत्या केली असा संशय व्यक्त करतात. नेपोलियनला जसे आर्सेनिक देऊन ठार मारले तेच लक्षणे बिरसा मुंडा यांच्या शरीरावर दिसत होते शिवाय त्यांना कारागृहातच दफन करून पुरावा नष्ट करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात जननायक बिरसा मुंडा यांचे योगदान अतुलनीय असे आहे. आदिवासींच्या न्याय हक्कासाठी मोठा लढा उभारून त्यांनी जे महान कार्य केले त्याला तोड नाही त्यामुळेच त्यांना आदिवासी जननायक हा किताब जनतेने बहाल केला. आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# मदत विचार करुनच करायला हवी?

दुसऱ्याला मदत किती करायची. हा एक संभ्रमाचाच प्रश्न आजच्या काळात निर्माण झाला आहे. कारण आजचा काळ हा स्वार्थी बनलेला आहे व या काळात लोकं फक्त मदत घेवू इच्छितात. मदत करु इच्छित नाहीत.

आपण लोकांना मदत करतो. कारण आपण ज्यांना मदत करतो. ती मंडळी लाचार दिसतात, गरीब दिसतात नव्हे तर भिकारी स्वरुपाचीही दिसत असतात. मग अशी मंडळी दिसली की दया येते आपल्याला. त्यातच दया आली की मग आपल्यात दानाची वृत्ती निर्माण होते व आपण दान देण्याच्या भावनेने मदत करतोच, फुल नाही तर पाकळीच्या स्वरुपात.

मदत....... मदत एखाद्या गरीब, लाचारांना केली तर चालेलच. कारण ते खरंच गरीब असतात व त्यांना मदत देणं हे आपलं कर्तव्यच असतं. म्हणूनच आपण आपल्याकडून आपल्यापरीनं जशी जमेल तशी मदत करीत असतो. याचा अर्थ असा नाही की अशी मदत करीत असतांना आपण ज्याला मदत करतो. त्याची परिस्थिती पाहात नाही. इथंच आपलं चुकतं. असाच एक प्रसंग सांगतो. एका व्यक्तीच्या जीवनात घडलेला.

माथूर नावाचा तो व्यक्ती. तो सरकारी नोकरीवर होता व काहीतरी कारणावरुन त्याचं वेतन बंद होतं.

माथूरच्या वेतन बंदला दोन वर्ष झाली होती व त्याबाबत त्याचा खटला न्यायालयात सुरु होता. त्यातच त्याला दुसरा कोणताही कमविण्याचा पर्याय नसल्यानं त्याचीक परिस्थिती हलाखीची होती.

माथूर जेव्हा सरकारी नोकरीवर लागला. तेव्हापासून तो त्याचं वेतन बंद होईपर्यंत एका प्रशस्त दुकानात दरवर्षी मुलांना व पत्नीला सॉफ्टी खायला न्यायचा. परंतु आता वेतन बंद असल्यानं व परिस्थिती हलाखीची असल्यानं त्यानं आपल्या मुलांना व पत्नीला दोन वर्षापासून सॉफ्टी खायला नेलं नव्हतं. अशातक यावर्षी त्याच्या पत्नीनं त्याचेजवळ सॉफ्टी खाण्याचा तकादा लावला व लागलीच त्यानं आपल्या परिवाराला सॉफ्टी खायला नेलं.

ते सॉफ्टीचं दुकान प्रशस्त होतं व त्या सॉफ्टीच्या दुकानाच्या बाहेर काही भिकारी उभे असायचे की जे चहा पिण्याचं निमित्य सांगून भीक मागायचे. त्यातच एक म्हातारी आजीबाई माथूरच्या पुढ्यात आली. तिनं हात पसरला. तेव्हा माथूरनं तिच्याकडे पाहिलं. त्याला दया आली व त्यानं तिला दान म्हणून दोन रुपये दिले.

माथूरनं दोन रुपये दिले. परंतु दोन रुपये माथूरजवळून घेतल्यावरही आजीबाई गेली नाही. तशी माथूरनं सॉफ्टी हातात घेतली. त्यावेळेस तीच आजीबाई त्याचेकडे पाहात उभी होती. त्यावर तिला माथूर म्हणाला,

**आजीबाई, सॉफ्टी खाता का?**

माथूरचा त्या म्हाताऱ्या आजीला प्रश्न. त्यावेळेस तिनं होकार दिला व माथूरनं तिला सॉफ्टी दिली. त्यावेळेस त्यानं तिला विचारलं,

आजीबाई, तुम्हाला मुलंबाळं नाहीत का?

माथूरचा तो प्रश्न. त्यावर त्या आजीबाईनं दिलेलं उत्तर ऐकण्यालायक होतं. ती म्हणाली,

आहेत. मलाही दोन मुलं आहेत. चांगले अधिकारी आहेत. भरपूर पैसे कमवितात.

ती आजीबाई म्हणाली की तिची मुलं भरपूर पैसे कमवितात. तर मग ही भीक का मागत असावी? माथूरच्या मनात आणखी कुतूहल जागं झालं व तो म्हणाला,

आजीबाई, तुमची मुलं भरपूर पैसे कमवतात. मग तुम्ही असे भीक का मागताय?

का सांगू बापू. माझा मुलगा ऑफिसात गेला की माझी सून मला हाकलते व म्हणते की जर मी दोन तिनशे रुपये कमवून आणले नाही तर ती मला जेवन देणार नाही. मग या वयात मी कष्टाची तरी कोणती कामे करावीत? म्हणून मी भीक मागतो. दुसरं काय करु.

ते आजीबाईचं उत्तर. ते उत्तर ऐकून कोणालाही चक्रावल्यासारखंच वाटेल. अशी बरीच मंडळी आहेत की जे काही ना काही मजबुरीनं भीक मागत असतात. एक व्यक्ती एका रुग्णालयाजवळ सकाळीच आपल्या आईला भीक मागायला आणून बसवायचा व सायंकाळी तिला घरी न्यायचा व तिचे पैसे हिसकावून त्या पैशात दारु प्यायचा. असंच आणखी एक प्रकरण. त्या प्रकरणात एका म्हाताऱ्याला सहा मुलं होती व तो घरचा श्रीमंत होता. परंतु कोणीच त्याला खायला देत नसल्यानं तोही भीकच मागत फिरायचा. अशी भीक मागून त्यानं भरपूर पैसा गोळा केला होता. त्यातच तो कंजूष असल्यानं एक रुपयाही खर्च करायचा नाही. तेव्हा लोकं विचार करायचे की हा म्हातारा मरण पावल्यानंतर याचा पैसा हा त्याच्या न करणाऱ्या मुलाला होईल. त्यामूळं ही गोष्ट ज्याला माहीत होती. ती मंडळी त्याला भीक द्यायची नाहीत. आणखी एक प्रकरण होतं, एक आजीबाई मुलं करीत नाहीत म्हणून गावोगावच्या नातेवाईकांकडे जायची. त्यांना आपल्या मुलांची कैफियत सांगायची. आठ आठ दिवस राहायची. त्यातच तिला तिचे पती नोकरीवर असल्याने पेन्शनही मिळायची. परंतु ती, ती पेन्शन खर्च करायची नाही. त्यावेळेसही त्यावर लोकं विचार करायचे की या पेन्शनमधून वाचलेला पैसा तिच्या मुलांना होईल. आपल्याकडे ही येते व आठ आठ दिवस राहाते. तेव्हा तिच्या पाहूणचारात आपलाच पैसा खर्च होतो. हा विचार जेव्हा लोकांच्या मनात आला. तेव्हा लोकांनी आपला व्यवहार बदलविला व आता लोकं तिनं येण्याचा फोन केल्यास तिला टाळायचे. येण्याची जरी सुकसुकी लागल्यास ते त्यावर काहीही बहाणा करुन गायब व्हायचे.

हे दोनतीनच उदाहरणं नाहीत. अशी बरीचशी उदाहरणे आहेत की ज्या उदाहरणात भीक मागणारी मंडळी बरीच श्रीमंत असतात. तरीही भीक मागत असतात. अलिकडील काळात भीक मागण्यासाठी स्वतःचे हातपाय कापून घेणारीही बरीच मंडळी आहेत.

ही झाली भिकाऱ्याची गोष्ट. आज लोकं भिकारी लोकांनाच मदत करीत नाहीत तर ते मदत करतात आपल्या शत्रूंनाही. जर शत्रूला काही दुखापत झाली असेल तर....... त्याचं कारण आहे सहानुभूती आणि माणूसकी. त्यातच आपल्या पुर्वजांनी आपल्यावर केलेले चांगले संस्कार. त्याच संस्काराच्या भरवशावर आपण शत्रूंनाही मदत करण्यास मागं पुढं पाहात नाही. त्याच संस्काराच्या भरवशावर आपल्याला आपला देवही तेवढा प्रिय वाटत नाही. शिवाय त्याच संस्काराच्या भरवशावर आपल्याला कोणी आपल्याबद्दल, आपल्या देवादिकांबद्दल, आपल्या संस्कृतीबद्दल काहीही म्हटलं तरी आपण त्या गोष्टीला विरोध करीत नाहीत.

एक असंच प्रकरण. अयोध्येत बाबरी मशीदीचा खटला लढणारा हासीम अंसारी. ज्याला खटला लढतांनाही हिंदूंनी मदत केली. जेव्हा त्याचे घर एका दुर्घटनेत जळाले. तेव्हा त्याला तेथीलच स्थानिक हिंदूंनी घर बांधून दिले.

त्याला न्यायालयात पेशीवर हजर राहावे लागत असल्याने, त्यासाठीही हिंदूंनी मदत केली. एवढंच नाही तर तो जेव्हा मरण पावला. तेव्हा त्याच्या अंत्यसंस्कार प्रसंगी हिंदूंची उपस्थिती जास्तच होती.

ही झाली येथील तमाम हिंदूंनी अयोध्येचा खटला लढत असतांना मुस्लिमांना केलेली मदत. तशी मुस्लिमांनीही हिंदूंना मदत केलेली आहे. शिवाजी महाराजांना जर मुस्लिमांनी मदत केली नसती तर स्वराज्य स्थापन झालं नसतं. मुस्लिमांनी सावित्रीबाईला मदत केली नसती त्यावेळेस तर आजही स्रीशिक्षण नसतं.

महत्वपुर्ण बाब ही की संस्कृतीच्या नादात आपण आजही आपली माणूसकी सोडलेली नाही. ती माणूसकी धरुनच वागतो. म्हणूनच शत्रुलाही आपण मदत करीत असतोच. आपल्याला माहीत असतेच आपण जेही कार्य करतो, त्या कार्याची फलश्रृती. शिवाय ज्यांना आपण मदत करतो. त्यांचा पुर्व इतिहास. त्याची पुर्व परिस्थिती. ते उणे दुणे. ते गुणदोष. तरीही आपण आपल्यातील मदतीची भावना खंडीत करत नाही. म्हणूनच या देशातील गरीब, लाचार दिसणारे भिकारी आज गर्भश्रीमंत आहेत आणि मदत करणारी मंडळी त्या भिकारी वर्गापेक्षा कितीतरी पटीनं गरीब. तरीही आपण मदत करणं सोडत नाही. उलट मदतीला प्रत्यक्ष देवाचा हवाला देत असतो. म्हणतो की आपण जे काही करतो. ते देवाला माहीत असतं. आपल्या पुर्वजन्मात त्यांनी आपल्याला मदत केली असेल. म्हणूनच आपणही त्यांना मदत करीत असतो.

महत्वपुर्ण बाब ही लक्षात घेण्यासारखी आहे की मदत ही अवश्यच करायला हवी. परंतु ती करतांना आपण ती कशासाठी करतोय. ते जाणून घ्यायला हवे. ते कारण आपल्याला योग्य वाटत असेल तर अवश्य मदत करावी.

जसा अपघात. अपघातात जात, धर्म, पंथ, गरीब, श्रीमंत, उच नीचपणा या गोष्टी पाळू नयेत. परंतु जर आपलंच नुकसान होत असेल तर अशावेळेस मदत करु नये हे तेवढंच खरं.

**- अंकुश शिंगाडे नागपूर**

# टाकळी राजाराय मध्ये महावितरणचा अजब कारभार, वीज जोडली नसतानाही शेतकऱ्यांना पाठवलं १४ हजारांचं बिल...

**आत्ताच णक्सप्रेस**

**खुलताबाद प्रतिनिधी** / अपूर्ण काम,तरीही १४ हजारांचा अंदाजे विजबिलाचा धक्का! तालुक्यातील टाकळी टाकळी राजाराय येथील प्रकार... खुलताबाद तालुक्यातील टाकळी राजेराय गावातील समद बुढान शेख या शेतकऱ्याला विजतंत्री अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणाचा फटका बसला आहे. २०१७ साली त्यांनी आपल्या शेतासाठी (गट क्र. ४९०) महावितरणकडून ५ एच पीचे नविन विजजोडणी घेतली होती.शासन योजनेत मंजूर झालेल्या नव्या डी.पी.चे काम पाच-सहा वर्षांपासून अपूर्णच आहे.

अलीकडे त्या ठिकाणी पोलवर डी.पी. बसवण्यात आली असली तरी, अद्याप कोणतेही वायरिंग करण्यात आले नाही आणि मीटर देखील बसवलेले नाही.तरी सुद्धा महावितरण विभागाकडून ऑनलाईन प्रणालीत २,९४० युनिट विज वापर दाखवत अंदाजे १४,९०० रुपयांचे बिल आकारण्यात आले आहे.


या संदर्भात शेतकरी समद बुडन शेख यांनी कनिष्ठ अभियंता. शाखा अभियंता महावितरण सुलतानपूर यांच्याकडे. तक्रार अर्ज देत अंदाजे दिलेले विज बिल रद्द करून शून्य करण्याची.व तसेच डीपीचे अपूर्ण राहिलेले काम तातडीने मार्ग लावून पूर्ण करण्याची मागणी केली आहे.. खुलताबाद तालुक्यात

टाकळी राजारायमध्ये पुन्हा एकदा महावितरण विभागाचा अनागोंदी कारभार उघड झाला आहे. शेतकरी समदं बुडन शेख या शेतकरी बांधवांना शासनाच्या योजना अंतर्गत गट नंबर ४९० मध्ये २१/ ११/२०१७ / रोजी पाच एचपीची डी पी मंजूर झाली होती या डीपीला आद्यपर्यंत वीज जोडणी नसताना महावितरणने १४ हजार रुपयांचे वीज बिल समद बुडन शेख या शेतकरी बांधवांना पाठवले.

शेतकऱ्यांनी आपल्या शेतीत बांधलेले विहिरी तिथे वीजपुरवठा झालेला नाही.मात्र महावितरण विभागाचे अधिकाऱ्यांनी वीज जोडणीसाठी शेतकरी समद बुडन शेख यांनी वारंवार पाठपुरावा केले तरी आद्यपर्यंत विज पुरवठा करण्यात आले नाही मात्र या

अल्पभूधारक शेतकऱ्याची थट्टा; वीज जोडणी न देताच तब्बल १४ हजार रुपयांचे बिल टाकळी राजाराय येथे महावितरण विभागाचे अजब प्रकार उघडकीस आला आहे. शेतकऱ्याच्या पंपाला वीज कनेक्शन न देता महावितरण कंपनीने चक्क १४ हजार रुपयांचे बिल आकारले आहे.

खुलताबाद तालुक्यात महावितरण विभागाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे.



टाकळी राजाराय येथील समद बुडन शेख या शेतकऱ्याच्या पंपाला कृषी वीज कनेक्शन न देताच विद्युत कंपनीने चक्क १४ हजाराचे बिल आकारले आहे. विशेष म्हणजे सदर शेतकरी वीज कनेक्शनसाठी कार्यालयाचे खेटे मारत आहे. असे असताना ही कुठलीच वीज जोडणी न देता १४ हजार रूपयाचे बिल दिल्याने आश्चर्य आणि व्यक्त केला जात आहे.

खुलताबाद तालुक्यातील टाकळी राजाराय येथील अल्पभूधारक शेतकरी समद बुडन शेख यांच्या नावे तीन एकर जमीन आहे. त्यांनी २१/११ २०१७ मध्ये त्यांच्या गट क्रमांक ४९० या शेतात विहीर बांधली. त्यानंतर शासनाच्या शासकीय योजनेअंतर्गत समद बुडन शेख यांना डी पी मंजूर झाली.वीज जोडणीसाठी. शेतकरी समद बुडन शेख यांनी शाखा अभियंता यांचेकडे अनेक वेळी निवेदनद्वारे विद्युत मीटर बसून देण्याची मागणी केली होती.मात्र अद्याप ही वीज जोडणी देण्यात आली नाही.वीज जोडणीसाठी शेतकरी महावितरण कार्यलयाचे खेटे मारावे लागले.

दरम्यान सातत्याने पाठपुरावा करून सुद्धा वीज जोडणी करून मिळत नसल्याने व्यवस्थित होऊन शेतकरी हे लवकरच सदरचे प्रकरण जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच दाखल करणार आहे,

# गटविकास अधिकारी यांच्याकडे पेवर ब्लॉक जाणीवपूर्वक काढणाऱ्यावर कारवाईची मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/प्रतिनिधी/ सुभान शहा/** गटविकास अधिकारी पंचायत समिती गंगापूर यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे की गणेश पांडुरंग दाणे यांनी गंगापूर

तालुक्यातील जांभळा येथे दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत बसवण्यात आलेले पेवर ब्लॉक जाणीवपूर्वक व हेतू पुरस्पर काढून, कामगारांना अर्वाचे भाषेत शिवीगाळ तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याबद्दल योगेश दाने, सोमनाथ बनकर, यांनी तक्रार दाखल केले आहे तसेच दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे की मौजे जांभळा ग्रामपंचायत अंतर्गत व दलित वस्ती सुधार योजनेतून दलित वस्तीत अंदाजे पाच लक्ष रुपयाचे पेवर ब्लॉक बसवण्याचे काम सरपंच व ग्रामसेवक यांच्या देखरेखीखाली सुरू होते, सर्व काम सुरळीत चालू असताना सरपंच व ग्रामसेवक काम झाल्यावर आपापल्या घरी गेले असताना गणेश दाणे यांचा जागेचा ग्रामपंचायतला कोणताही रेकॉर्ड नाही तरीसुद्धा त्यांनी गल्लीत बसवलेले पेव्हर ब्लॉक काढून टाकले व कामगारांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली आहे.

गणेश दाणे यांचे नमुना नंबर आठ नुसार त्यांची जागा मोजून बाकीच्या ठिकाणी पेवर ब्लॉक बसविण्याची ग्रामपंचायत कार्यालयास आदेश देण्यात यावे आणि जे पेव्हर ब्लॉक बसवले त्या पेवर ब्लॉक झालेले नुकसान गणेश दाणे, यांचे बंधू दिनेश दाणे व यांच्या परिवाराकडून वसूल करून त्यांच्यावर नियमानुसार शासकीय कामात अडथळा व शासकीय संपत्तीचे नुकसान केले म्हणून गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात यावे. लवकरात





लवकर गणेश दाने यांचे जागेची मोजणी करून त्यांचा रेकॉर्ड तपासण्यात येऊन राहिलेले काम त्वरित करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे या निवेदनावर योगेश दाने, सोमनाथ बनकर, यांच्या स्वाक्षऱ्या आहे.

# वाळूज येथे भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या जिल्हा व तालुका महिला पदाधिकारी यांची निवड

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/ प्रतिनिधी/ सुभान शहा/** वाळूज येथे भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या जिल्हा व तालुका महिला पदाधिकारी यांची निवड झाल्याबद्दल स्नेहसंमेलन व सत्कार समारंभ

आमदार प्रशांत बंब, यांच्या नेतृत्वात जिल्हा अध्यक्ष संजय खंबायते , गंगापूर रत्नापूर तालुक्याचे आमदार प्रशांत बंब , प्रदेश सदस्य किशोर आबा धनायत, जिल्हा महामंत्री ज्योतीताई अविनाश गायकवाड, जिल्हा अध्यक्ष जयमालाताई वाघ. अविनाश गायकवाड, विधानसभा गंगापूर प्रकोष्ट यांच्या नेतृत्वात १)मंगल ताई राजेंद्र काळे महिला मोर्चा सचिवपदी निवड, २) वंदना बंडू पवार तुर्काबाद जिल्हा सदस्य ३) मनीषाताई वाल्मीक सोमासे जिल्हा सदस्य, कल्पनाताई कृष्णा सोळंके जिल्हा सदस, संगीताताई संतोष बोरुडे मंडळ अध्यक्ष पदी निवड, अनुसूचित जाती जिल्हाध्यक्ष आदित्या सोनाळे , यमुना रमेश भवर वाळूज शहर अध्यक्ष, सीता ओम दास हजारे चिटणीस, लताताई इले, या सर्व मैत्रिणींच हार्दिक हार्दिक अभिनंदन करण्यात आले. काही मैत्रिणींचा झालेला पक्षप्रवेश...उमा उत्तम पाटील, चंचल पवार , ज्योतीताई कुंजर ,ललिता भाग्यवंत प्रतिभा भाग्यवंत, प्रीती कॅनडी, संगीता मोरे, सुनिता भागवत, शीला शिंदे जया साबळे सपना बम्नावत पूजा ढेरे, हे निवडीचा कार्यक्रम दिनांक १२ नोव्हेंबर रोजी उत्साहात पार पडला यावेळी कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.



# बिडकीन ग्रामपंचायतच्या गळ्यात बाहेरच्या लोकांनी केले ताबे..

**आत्ताच णक्सप्रेस**

**बिडकीन प्रतिनिधी** / काही वर्षापुवी बिडकीन शासकीय विश्रामगृहा जवळचे बरेच अतिक्रमण काढण्यात आले होते.त्या अतिक्रमात गावातील गोरगरीब छोटे-मोठे व्यवसायिक आपली व्यवसाय चालवायचे. त्यामुळे अनेक लोक बेरोजगार झाले व त्यांची दयनीय अवस्था झाली.ग्रामपंचायतच्या एकूण काही गाळ्यांपैकी काही काळे बाहेरच्या परस्पर गाळे धारकांनी विकले.ते गाळे. नियमानुसार परत बिडकीन नागरिकाना भाडे करार करून देण्यात यावी अशी जनतेत चर्चा आहे.दुसऱ्या गावाची व्यापारी येऊन मूळ मालकाकडून खरीदारी कशी व कोणत्या आधारे केली याची चौकशी व्हायला हवी. गादी व्यापाऱ्यांने दोन गाळे कोणत्या आधारे खरिदी केले. (एक गाळा खरेदी केला व एक गाळा भाड्याने घेतला) याची चौकशी व्हायला हवी.ग्रामपंचायतची प्रॉपर्टी १० ते १२ लाखात विकत कशी घेतली याची चौकशी व्हायला हवी असे अनेक प्रश्न जनतेत चालू आहे.

**सन २००२ चा करारनामा**

२००२ च्या करारनामा




नियम व अटी नुसार ज्याना गाळे दिले ते फक्त स्वतःहा साठी वापर करतींन दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीला भाड्याने देणार नाहि ग्रामपंचायत बिड़किन ला तसे अढळून आल्यास ग्राम.प. बिड़किन ताब्यात घेऊ शकते असे लेखी लिहून घेण्यात आले होते.मग ते विकले कसे याची प्रशासणाने सखल चौकशी करुन् दोषी वर कार्यवाही करायला पाहिजे असे जंनतेत चर्चा चालु आहे.लवकरात लवकर लीलावाचा निर्णय न झाल्यास काही सामाजिक कार्यकर्ते न्यायलयात मध्ये याचिका दाखल करणार आहे. ग्रामपंचायतने हे गाळे परत लिलाव करून फक्त बिडकीन ग्रामस्थांना देण्यात यावी अशी नागरिकांमध्ये चर्चा चालू आहे.

# आचारसंहिता क्षेत्रातील ७६ जणांना २४ तासांत शस्त्र जमा करण्याचे आदेश

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ जिल्ह्यातील ज्या नगरपालिका, नगरपंचायत क्षेत्रात निवडणूक आचारसंहिता सुरु आहे, त्याक्षेत्रातील शस्त्रपरवानाधारक ८८ पैकी ७६ जणांना २४ तासांत आपली शस्त्रे नजिकच्या पोलीस स्टेशनला जमा करण्याचे आदेश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत.

यासंदर्भात आज सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक झाली. बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, पोलीस निरीक्षक संजय देशमुख आदी उपस्थित होते. सद्यस्थितीत निवडणूक आचारसंहिता सुरु असलेल्या सहा नगरपालिका व एक नगरपंचायत क्षेत्रात एकूण ८८ व्यक्ती शस्त्रपरवानाधारक आहेत. त्यापैकी ७६ लोकांना शस्त्र जमा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अन्य १२ व्यक्तित ज्यांना त्यांचे शासकीय कर्तव्य म्हणून शस्त्र बाळगावे लागते त्यांचा समावेश आहे. तरी या ७६ व्यक्तिंनी दि.१५ रोजी मध्यरात्री १२ वा. पर्यंत आपल्याकडील शस्त्र नजिकच्या पोलीस स्टेशनला जमा करावे,असे आदेश देण्यात आले आहेत. निवडणूक आदर्श आचारसंहितेचा भाग म्हणून शस्त्र जमा केले जात आहेत.

# जिल्ह्यातील ग्रामीण भागात मनाई आदेश

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ आगामी कालावधीत कायदा सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून जिल्ह्यातील ग्रामीण भागात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व ३७ (३) अन्वये मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी जनार्दन विधाते यांनी हे आदेश निर्गमित केले असून दि. २९ नोव्हेंबर पर्यंत हे आदेश अमलात राहतील,असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# पेट्रोरसायन अभियांत्रिकी व उद्योग संस्थेचा विनामूल्य प्लास्टिक प्रोसेसिंग अभ्यासक्रम; इच्छुकांकडून अर्ज मागविले

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/भारत सरकारच्या पेट्रोरसायन अभियांत्रिकी व प्रौद्योगिकी संस्था (सिपेट) यांच्यावतीने प्लास्टीक प्रोसेसिंग मशिन ऑपरेटर हा चार महिने कालावधीचा विनामूल्य अभ्यासक्रम राबविण्यात येतो. या अभ्यासक्रमास इच्छुकांकडून प्रवेश अर्ज मागविण्यात आले आहेत. अर्जाचा नमुना्.लळशिीं.सीें.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. हा अभ्यासक्रम पूर्णतः निःशुल्क असून राज्यातील रहिवासी असलेल्या १८ ते ३० वर्षे वयोगटातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय , आर्थिक मागासलेल्या गटातील युवक युवतींसाठी हा चार महिने कालावधीचा अभ्यासक्रम विनामूल्य आहे. या अभ्यासक्रमाच्या ५५ जागा असून १० वी उत्तीर्ण किंवा त्याच क्षेत्रातील अनुभव असलेल्या इयत्ता ८ वी पर्यंत शिक्षण झालेले उमेदवारही अर्ज करु शकतील.अधिक माहिती व अर्जाचा नमुना्.लळशिीं.सीें.ळप या संकेतस्थळावर आहे. प्रवेश प्रक्रिया दि.२४ नोव्हेंबरपासून सुरु होत आहे. अधिक माहितीसाठी ९३२५६८७९१०/ ९६०१३६४५५०/९१४५६७५५८५ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन व्यवस्थापक सिपेट, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

# शासकीय कर्मचाऱ्यांचा माहिती कोष

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई या कार्यालयाकडून महाराष्ट्र राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांच्या सर्वंकष माहितीचे स्वयंचलित अध्ययन करण्याची कार्यवाही करण्यात येत असून, या वर्षी देखील माहितीचे अध्ययन करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर माहितीच्या आधारे नियमित कार्यालयातील कार्यालयीन स्थापत्याच्या कर्मचाऱ्यांची विभागवार नोंद करण्यात येते (उदा. कार्यालयीन, अभियंत्रिकी, अंशकालीन, मानधन इत्यादी). तसेच सदरच तत्त्वावर सरकारी कार्यालयात कार्यरत असलेल्या इतर प्रकारच्या कर्मचा-यांची माहिती १ जुलै २०२५ या स्थायी दिनांकानुसार नोंदविण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागामार्फत दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी सर्वंकष माहिती कोष-२०२५ बाबत शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. जिल्हा स्तरावरील संबंधित जिल्हा सांख्यिकी कार्यालयांतर्फे कर्मचाऱ्यांचा सवंकष माहितीकोस्ह तयार करण्याची कार्यवाही करणार आहेत. अर्थ व सांख्यिकी संचालनालय, शासनाच्या सर्वंकष माहिती कोष-२०२५ नोंदणी करण्यासाठी ऑनलाईन संगणकीय आज्ञावली, फ्लोचार्ट शासन परिपत्रक https://mahades.maharashtra.gov.in/CGI या संकेतस्थळावर EMDB-2025 या नावाने उपलब्ध करून देण्यात आले आहे. माहिती नोंदणी करताना कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांची माहिती नोंदणी करण्याची जबाबदारी सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी घ्यावयाची आहे. जिल्ह्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी ऑनलाईन संगणकीय संपूर्ण माहिती नोंदणी दिनांक ०२ सप्टेंबर २०२५ ते ०२ डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करावयाची आहे. जिल्हा सांख्यिकी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांचे कडून दिले जाणारे माहिती नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र नोव्हेंबर २०२५ (नोव्हेंबर २०२५ to be paid in December २०२५) च्या वेतन देयकासह व माहिती बरोबर असलेले दुसरे प्रमाणपत्र मार्च फेब्रुवारी २०२६ (February 2026 to be paid in March 2026) च्या वेतन देयकासह सादर करावे. तसेच शासन संचालनालय मूळ विभागास (Parent Department) प्रमाणित माहिती आवश्यक असल्यास, संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी मूळ विभागास (Parent Department) आंतरलक्ष्यक आकस्मिकता तक्ता (DAT) प्रस्ताव सादर करावा व त्याची प्रत जिल्हा कोषागार अधिकारी (DSO) कार्यालयास सादर करावी. अन्यथा सदर वेतन देयक कोषागार कार्यालय/अधिकरण व लेखा कार्यालयाकडून पारित केले जाणार नाहीत,असे उपसंचालक जिल्हा सांख्यिकी कार्यालय शी. वै. मिसाळ यांनी कळविले आहे.

# पदवीधर मतदारसंघाच्या मतदार नोंदणीसाठी नमून -१८ च्या अर्जावर कार्यवाही करण्याच्या कालावधीत वाढ

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांचे १४ नोव्हेंबर, २०२५ पत्रान्वये पदवीधर मतदारसंघाच्या मतदार नोंदणीसाठी नमून-१८ च्या अर्जावर कार्यवाही करण्यासाठी तारीख वाढवून दिली असून सुधारित कार्यक्रम जाहिर केला आहे. हस्तलिखीते तयार करणे व प्रारुप मतदार याद्यांची छपाई दिनांक २८ नोव्हेंबर, २०२५, प्रारुप मतदार याद्यांची प्रसिध्दी दिनांक ०३ डिसेंबर, २०२५, दावे व हरकती स्विकारण्याचा कालावधी दिनांक ०३ ते १८ डिसेंबर, २०२५, दावे व हरकती निकाली काढण्याचा दिनांक व पुरवणी यादी तयार करणे व छपाई करणे दिनांक ०५ जानेवारी, २०२६, मतदार यादीची अंतिम प्रसिध्दी दिनांक १२ जानेवारी, २०२६ असा केला असल्याचे मतदार नोंदणी अधिकारी ५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ जितेंद्र पापळकर यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे.

# बालआनंद उत्सव-२०२५

# सादरीकरणातून शिकाल जीवन जगण्याची कला- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी



**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ कलांचे सादरीकरण हे नेहमीच आत्मविश्वास आणि संधी देत असते. मात्र विविध प्रकारचे कलासादरीकरणातून आपल्याला जीवनात विविध प्रसंगांना सामोरे जाण्याची म्हणजेच जीवन जगण्याची कलाही आपण शिकत असतो, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.

येथील देवगिरी महाविद्यालयातील रविंद्रनाथ टागोर सभागृहात आयोजीत बालआनंद उत्सव २०२५ च्या प्रसंगी जिल्हाधिकारी स्वामी उपस्थित होते. बालकांनी सादर केलेल्या विविध कलागुणांचे सादरीकरण त्यांनी पाहिले. जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्य) आश्विनी लाटकर, प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर, जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, उपशिक्षणाधिकारी सीताराम पवार, श्रीमती सीमा मेहेत्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त साजरा केल्या जाणाऱ्या बालदिनानिमित्त जिल्हा परिषद शिक्षण विभाग (माध्यमिक) यांच्या वतीने दि.७ ते १४ नोव्हेंबर या कालावधीत शालेय विद्यार्थ्यांच्या स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाचा आनंदोत्सव आयोजित करण्यात आला. आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय आणि राज्यस्तरावर शाळा आणि महाविद्यालयांमधून विशेष प्राविण्य प्राप्त केलेल्या विविध कला व क्रीडा प्रकारातील विद्यार्थ्यांचा गुणगौरव मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ८१ आंतरराष्ट्रीय,राष्ट्रीय आणि राज्यस्तरावर विशेष प्राविण्य प्राप्त, प्रज्ञावान व प्रतिभासंपन्न विद्यार्थ्यांचा सन्मानीत करण्यात आले. या कार्यक्रमाची सांगता आज सांस्कृतिक स्पर्धा व गुणगौरव सोहळ्याने झाली. या स्पर्धेत जिल्ह्यातील २९ शाळांच्या संघांनी सहभाग नोंदवला. यात समूह नृत्य, एकल नृत्य, नाट्य, गायन या सर्व कलाप्रकारांचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले. सूत्रसंचालन श्रीमती सुनीता वाघ, श्रीमती कविता रगडे, प्रवीण दाभाडे यांनी केले.

### सांस्कृतिक कार्यक्रम स्पर्धांचे निकाल-

समूह नृत्य-प्रथम क्रमांक - (वारकरी नृत्य) संत ज्ञानेश्वर विद्यालय निल्लोड फाटा, सिल्लोड , द्वितीय क्रमांक - ( आदिवासी नृत्य) पी एम श्री जिल्हा परिषद तुर्काबाद खराडी ता. गंगापूर.तृतीय क्रमांक- ( देशभक्तीपर गीत) ,आ कृ वाघमारे प्रशाला, छत्रपती संभाजीनगर

गीत गायन- प्रथम क्रमांक - राजे शिवाजी विद्यालय, वाळूज, पुनम चव्हाण, नाट्यः- प्रथम क्रमांक - जिजामाता विद्यालय, छत्रपती संभाजी नगर. वैयक्तिक नृत्यः- प्रथम क्रमांक- कार्तिकी चंदेल (लोकनेते साहेबराव पाटील विद्यालय शिल्लेगाव, तालुका गंगापूर) भारुड प्रकार- प्रथम क्रमांक नेहरू विद्यालय सावखेडा.., तालुका वैजापूर.


## कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर

**यांचे कार्यालय**

**पदमपुरा परीसर, छत्रपती संभाजीनगर -४३१००५**

**ई-मेल-** aurangabad.eemahapwd.gov.in **दुरध्वनी ०२४०-२३३१०२२**

**सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मंबई शासन शुध्दीपत्रक क्रमांक सीएटी / २०२४/प्र.क्र.१४४/इमा-२ दिनांक - २८/०२/२०२४**

**ई निविदा सूचना क्रं. २६७ सन २०२५-२६**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर (दुरध्वनी क्रमांक ०२४०-२३३११७४) महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम यांच्या कडुन खालील (०४) कामाकरिता योग्य त्या वर्गातील नियमित नोंदनिकृत ठेकादाराकरिता बी-१ नमुन्यातील निविदा (ऑनलाईन) प्रणालीव्दारे मागविण्यांत येत आहे.

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१) http://mahapwd.gov.in

२) https://mahatenders.gov.in (सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यांत येईल)

३) कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयातील सुचना फलक

**जिमाका/छ.स. न. जाहि/३९५/ २०२५ -२०२६**

**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**छत्रपती संभाजीनगर**


# सोयगाव शेंदूरणी रस्ता तात्काळ सुरु करा, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा - भाजपा जिल्हा चिटणीस सुनील गावंडे

**आत्ताच एक्सप्रेस/**

**सोयगाव / प्रतिनिधी** / अनेक वर्षांपासून सोयगाव-शेंदूरणी हा महत्वाचा मार्ग अक्षरशः खड्यांमध्ये हरवला आहे. मराठवाडा आणि खानदेशाला जोडणाऱ्या या प्रमुख रस्त्याची अवस्था इतकी बिकट झाली आहे की, रस्ता ओळखही न येण्याजोगा झाला आहे. या रस्त्यावर दररोज दुर्घटना घडत असून, आतापर्यंत अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे.



या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने जनतेत तीव्र संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर भाजपा जिल्हा चिटणीस सुनील गावंडे यांनी प्रशासनाला इशारा देत म्हटले की, सोयगाव-शेंदूरणी रस्त्याचे काम तातडीने सुरू न केल्यास भाजपकडून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

गावंडे यांनी पुढे सांगितले की, हाच रस्ता मराठवाडा आणि खानदेश या दोन प्रदेशांना आर्थिक व सामाजिकदृष्ट्या जोडणारा कणा आहे. त्यामुळे हा रस्ता सुरू करणे केवळ विकासाचा प्रश्न नाही, तर जनतेच्या सुरक्षेचा प्रश्न आहे. त्यांनी सोबतच सोयगाव-पलासखेडा रस्ता व सोयगाव-शेंदूरणी मार्गाचे कामही एकाचवेळी सुरू करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली.

या प्रसंगी तालुका अध्यक्ष संजय पाटील,माजी सरपंच वसंत बनकर,राजेंद्र जावळे,मा.अध्यक्ष बद्रि राठोड, तालुका खरेदी विक्री संघ संचालक मंगेश सोहनी,मयुर मनगटे,प्रमोद पाटील,ता.उपाध्यक्ष विशाल गिरी,राजेंद्र म्हस्के, आदी मान्यवर उपस्थित होते. जनतेकडून देखील या मागणीला जोरदार पाठिंबा मिळत असून, रस्ता कामाचा विषय आता आंदोलनाच्या उंबरठ्यावर पोहाेचला आहे.

# बालसाहित्यिकांची कार्यशाळा व ग्रंथप्रदर्शन

## वाचन हे एकमेव व्यसन ज्यामुळे माणूस वाचतो- ज्येष्ठ साहित्यिक बाबा भांड

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ वाचनाची आवड मानवाला सुसंस्कृत बनविण्याबरोबरच त्याला भौतिक व मानसिकरित्या प्रगत करण्यास सहाय्यभूत ठरते. वाचन हे एकमेव व्यसन आहे ज्यामुळे माणूस वाचतो असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक बाबा भांड यांनी केले. सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालय, शासकीय विभागीय ग्रंथालय आणि युगंधरा मराठी साहित्य, कला व सांस्कृतिक प्रतिष्ठान, छत्रपती संभाजी नगर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय ग्रंथालय सप्ताह तथा भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू व भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त बालसाहित्यिकांच्या कार्यशाळेचे व ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन शुक्रवार दिनांक १४ नोव्हेंबर रोजी समर्थ नगर येथील शासकीय विभागीय ग्रंथालयात करण्यात आले. कार्यशाळेचे उद्घाटक म्हणून ज्येष्ठ साहित्यिक, प्रकाशक बाबा भांड बोलत होते.

बालवयातच वाचनाची व लिखाणाची गोडी शिक्षकांमुळे मिळाल्याचे सांगून बालवाचकांना तसेच नवोदित लेखकांना लिखाणासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन बाबा भांड यांनी दिले. छत्रपती संभाजीनगर विभागाचे सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे हे अध्यक्षस्थानी होते तर प्रमुख अतिथी म्हणून विभागीय सहाय्यक भाषा संचालक बाबासाहेब जगताप, युगंधरा प्रकाशनच्या सुनिता कावसनकर, पी.यू. जैन शाळेचे मुख्याध्यापक विजय पाटोदी, जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष साबळे, जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाह गुलाबराव मगर,डी.बी.देशपांडे हे उपस्थित होते.

कार्यशाळेस शहरातील श्री शारदा मंदिर कन्या प्रशाला,जय भवानी माध्यमिक विद्यामंदिर, देवगिरी हायस्कूल, न्यू देवगिरी हायस्कूल,मराठा हायस्कूल, पी. यु. जैन माध्यमिक विद्यालय या शाळेतील विद्यार्थी व शिक्षक यांनी सहभाग घेतला. याप्रसंगी सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.



प्रस्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ग्रंथालय निरीक्षक आवजी गलांडे यांनी मानले. याप्रसंगी भरविण्यात आलेले ग्रंथ प्रदर्शन दि.२० नोव्हेंबर पर्यंत कार्यालयीन वेळेत सर्वांसाठी निशुल्क खुले राहणार असून परिसरातील वाचन प्रेमी नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव यांनी केले आहे.

# नादरपुर जिल्हा परिषद शाळेत बालदिन

## पंडित जवाहरलाल नेहरु यांची जयंती साजरी

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/ सुनिल निकम** / कन्नड तालुक्यातील नादरपुर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत बालदिन व भारताचे पहिले पंतप्रधान भारतरत्न पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त बालदिन साजरा करण्यात आला जवाहरलाल नेहरू यांच्या जीवनावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना प्रेरित केले तसेच गोड पदार्थ सेवन कमी करावे यासाठी विद्यार्थ्यांना आवाहन केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामहरी निकम सर यांनी केले या वेळी मुख्याध्यापक नरेंद्र पाटील आर के निकम एस एस जाधव जे एस कोंडके, पी डी जंगले,




विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केली व सप्ताह निमित्त शाळेत विद्यार्थ्यांनी चित्रकला स्पर्धेत भाग घेऊ संपन्न झाली कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान मुख्याध्यापक नरेंद्र पाटील सर यांनी भूषविले याप्रसंगी जगन्नाथ कोंडके सर तसेच सर्व कर्मचारी उपस्थित होते त्यांनी पंडित के के जंगले, एस घोडके शाळेतील सर्व शिक्षक वृंद शालेय अध्यक्ष उपाध्यक्ष व्यवस्थापन समिती सर्व सदस्य ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच सर्व सदस्य तंटामुक्त अध्यक्ष पोलीस पाटील गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.छायाचित्र सुनिल निकम

# बिहार विधानसभेतील विजयाचा जल्लोष जालनात...

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ भाजपा जालना महानगर जिल्ह्याच्या वतीने बिहार विधानसभेतील विजयाचा जल्लोष उत्साहात साजरा करण्यात आला. जालना येथील भाजपा जिल्हा कार्यालयासमोर भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने एकत्र येऊन आनंदोत्सव साजरा करताना दिसले.

**मतमोजणीची पार्श्वभूमी :**

१४ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजता बिहार विधानसभेच्या मतमोजणीला सुरुवात झाली. दुपारी २ वाजेपर्यंत मिळालेल्या आकडेवारीनुसार एनडीएचे उमेदवार तब्बल २०० जागांवर मोठ्या फरकाने आघाडीवर होते. ही आघाडी पाहून बिहारमध्ये पुन्हा एकदा एनडीएचे सरकार स्थापन होणार, याबाबत भाजपा कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह पसरला होता.

**जालना भाजपचा जल्लोष :**

या पार्श्वभूमीवर जालना महानगर भाजपा नेते, माजी आमदार कैलासजी गोरंटयाल यांच्या नेतृत्वाखाली विजयाचा जल्लोष साजरा करण्यात आला. भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष व प्रदेश निमंत्रित सदस्य रामेश्वर पाटील भांदरगे, प्रदेश निमंत्रित सदस्य विजय कामड, माजी जिल्हाध्यक्ष पांगारकर, युवानेते अक्षय गोरंटयाल यांच्यासह वरिष्ठ पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भाजप कार्यकर्त्यांनी कार्यालयासमोर मिठाई वाटप, फटाक्यांची आतषबाजी, ढोल-ताशांचे वादन, घोषणाबाजी आणि नृत्य अशा पारंपरिक उत्साहात विजय साजरा केला. परिसरात वातावरण पूर्णपणे आनंदी आणि उत्साहपूर्ण झाले होते.

**नेतृत्वाचे प्रतिपादन**

या वेळी बोलताना कैलास गोरंटयाल म्हणाले,

बिहारमध्ये गेल्या काही वर्षांत एनडीए सरकारने केवळ विकासच नाही केला, तर जंगलराज संपवून सुशासनाचा आदर्शही प्रस्थापित केला. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर बिहारच्या जनतेने पुन्हा एकदा ठाम विश्वास व्यक्त केला आहे. विकास, स्थिरता आणि सुशासनाचा मार्ग जनता निवडत आहे, याचा हा विजय हा पुरावा आहे.*

ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बिहार निवडणूक प्रचारात मोठी जबाबदारी पार पाडली.





त्यांनी मोठ्या प्रमाणात सभा, रॅली आणि संवादांद्वारे विकासाचे चित्र स्पष्ट केले. तसेच बिहार निवडणूक प्रभारी विनोद तावडे यांनी सर्व घटक पक्षांचा समन्वय साधत अतिशय काटेकोर नियोजन केले. त्यामुळे एनडीएला मोठा विजय मिळवता आला.

**कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती :**

या जल्लोषात जालना महानगर जिल्ह्यातील अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. त्यात सखुबाई पणबिसरे, वर्षाताई ठाकूर, वीरेंद्र धोका, सोपान पेंढारकर, सिद्धिविनायक मुळे, देविदास देशमुख, सुनील खरे, महेश निकम, अमोल धानुरे, संजय आटोळे, राजेंद्र भोसले, रवि अग्रवाल, अमोल कारंजेकर, सुनील पवार, सुभाष सले, जिवन सले, संदीप नाईकवाडे, संजय भगत, विजय पवार, रमेश गौरक्षक, सोनू सामलेटी, बापू साळवे, अनिल सरकटे, अर्जुन गेही, शशिकांत घुगे, सुनील राठी, विष्णू डोंगरे, बाबुराव भवर, सोमनाथ गायकवाड, रामलाल जाधव, आनंद झारकंडे, प्रमोद गंडाळ, रोशन चौधरी, सोमेश काबलिये, वसंत शिंदे, डोंगरसिंग साबळे, चेतन देसरडा, सागर वाहूळकर, दत्ता जाधव, उमेश अग्रवाल, शाम उगले, मनोज इंगळे, रणजीत रीडला, संजय माधवले, अजय मिसाळ, संतोष खंडेलवाल, गणेश जल्लेवार, रोहित खोडवे, सचिन मोहता, भगवान चांदोडे, रोहित नलावडे, योगेश सामलेटी, आकाश देशमाने, उमेश पेंढारकर, अनिल यशवंते आदींसह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले.

या जल्लोषामुळे जालना शहरात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले असून भाजप कार्यकर्त्यांनी विकासाचा विजय, मोदी पुन्हा एकदा, एनडीए जिंदाबाद अशा घोषणा देत शहर दणाणून सोडले.

# कायद्याशी संघर्षग्रस्त मुलींसाठी स्वतंत्र निरीक्षण गृह स्थापन करण्याची मागणी- बालदिनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ कायद्याशी संघर्षग्रस्त मुली तसेच काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या मुलींसाठी जिल्ह्यात स्वतंत्र निरीक्षण गृह किंवा तत्सम कोणतीही सुविधा उपलब्ध नसल्याने, या मुलींना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. सध्या त्यांना महिला सुधारगृहात ठेवले जात असून, तेथील परिस्थिती त्यांच्या मानसिक आणि भावनिक आरोग्यासाठी अनुकूल नाही. या गंभीर समस्येवर तातडीने तोडगा काढण्यासाठी बाल दिनाचे औचित्य साधून बाल कल्याण समितीचे माजी अध्यक्ष ड. संजय काळबांडे, नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ड. महेश एस. धन्नावत आणि सचिव ड. वैभव खरात यांनी जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांना निवेदन सादर केले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ च्या कलम ४७ नुसार, प्रत्येक जिल्ह्यात किंवा जिल्ह्यांच्या गटासाठी कायद्याशी संघर्षग्रस्त बालकांच्या तात्पुरत्या संगोपनासाठी, त्यांची काळजी घेण्यासाठी आणि पुनर्वसनासाठी स्वतंत्र निरीक्षण गृहे स्थापन करणे राज्य सरकारसाठी बंधनकारक आहे. या कायद्यातील तरतुदींनुसार, मुला-मुलींसाठी स्वतंत्र निवास व्यवस्था असणे आणि त्यांचे वय, मानसिक व शारीरिक स्थिती आणि गुन्ह्याच्या स्वरूपानुसार वर्गीकरण करणे अनिवार्य आहे.

सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी बालकांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांच्या पुनर्वसनावर भर दिला आहे. सम्पर्णा बेहेरु विरुद्ध भारतीय संघ यासारख्या प्रकरणांमध्ये न्यायालयाने बाल न्याय कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्याचे आणि बालकांसाठी असलेल्या संस्थांमध्ये पुरेशा सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, विशाल जीत विरुद्ध भारतीय संघ प्रकरणात न्यायालयाने बालकांच्या पुनर्वसनासाठी विशेष गृहे स्थापन




करण्याचे महत्त्व अधोरेखित केले होते. या निकालांमधून स्पष्ट होते की, कायद्याशी संघर्षग्रस्त मुलींसाठी सुरक्षित आणि वेगळी व्यवस्था करणे केवळ कायदेशीर कर्तव्यच नाही, तर ते त्यांच्या सर्वोत्तम हितासाठी आवश्यक आहे. ड. संजय काळबांडे यांनी म्हटले आहे की, जालना जिल्ह्यात कायद्याशी संघर्षग्रस्त मुलींसाठी स्वतंत्र निरीक्षण गृह किंवा सुरक्षित जागा उपलब्ध नाही. त्यामुळे अशा मुलींना महिला वसतिगृहात किंवा इतर संस्थांमध्ये ठेवले जाते, जे बाल न्याय कायद्याच्या मूळ उद्देशाच्या विरोधात आहे.

अशा ठिकाणी त्यांना योग्य कायदेशीर, मानसिक आणि भावनिक आधार मिळत नाही, ज्यामुळे त्यांच्या पुनर्वसनाच्या प्रक्रियेत गंभीर अडथळे निर्माण होत आहेत.ड. महेश एस. धन्नावत यांनी जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्या कार्याचा गौरव करत या प्रकरणात वैयक्तिक लक्ष घालण्याची विनंती केली. ते म्हणाले, जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांना बालकांच्या कल्याणासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल 'बालस्नेही' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांची बालकांच्या प्रश्नांप्रति असलेली संवेदनशीलता पाहता, त्यांनी या गंभीर विषयात लक्ष घालून कायद्याशी संघर्षग्रस्त मुलींना त्यांचे हक्क मिळवून द्यावेत.

सध्याच्या व्यवस्थेमुळे या मुलींना मोठ्या प्रमाणात त्रास आणि अडचणींचा सामना करावा लागत आहे आणि त्यांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन होत आहे.

बाल दिनाच्या दिवशी हे निवेदन देऊन, या समस्येचे गांभीर्य प्रशासनाच्या लक्षात आणून देण्यात आले आहे आणि लवकरात लवकर कायद्याच्या तरतुदींनुसार मुलींसाठी स्वतंत्र निरीक्षण गृह सुरू होईल, अशी आशा शिष्टमंडळाने व्यक्त केली आहे.

# जालना बसस्थानक परिसरात वाहतूक शिस्तीसाठी कठोर कारवाई!

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ १३ व १४ नोव्हेंबर २०२५ रोजी जालना बसस्थानक परिसरात वाहतूक कोंडी टाळून प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून वाहतूक नियंत्रण मोहिमेअंतर्गत ऑटो रिक्षांवर कारवाई करण्यात आली. बसस्थानकाबाहेर अनधिकृतपणे उभ्या असलेल्या अनधिकृत पार्किंगमुळे प्रवासी वाहतूक बाधित होत असल्याचे वारंवार निदर्शनास येत होते.

यासोबतच जालना बसस्थानक डेपो व्यवस्थापकांची भेट घेऊन बसस्थानक परिसरात 'नो पार्किंग' चे स्पष्ट फलक तात्काळ बसविण्याबाबत निर्देश देण्यात आले. बसस्थानकाच्या हद्दीत किंवा मुख्य रस्त्यावर ऑटो रिक्षा

प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी, वाहतूक शिस्तीसाठी आणि जालना शहरातील सततच्या वाहतूक व्यवस्थापन सुधारासाठी हे पाऊल महत्त्वाचे असल्याचे परिवहन विभागाने सांगितले आहे.

आज रोजी दिनांक १४ २०२५ रोजी जालना बस स्थानक परिसरात ट्राफिकची कोंडी होऊ





अनेक रिक्षांची तपासणी करून त्यांच्यावर तात्काळ दंडात्मक कारवाई करण्यात आली.

वाहतूक सुरळीत राखण्यासाठी ऑटो रिक्षा चालकांना मुख्य रस्त्यावर अडथळा निर्माण न करण्याच्या सक्त सूचना देण्यात आल्या. बसस्थानक परिसरात रिक्षांच्या उभ्या राहू नयेत याबाबतही त्यांना आवश्यक सूचना दिल्या आहेत.

ही संपूर्ण मोहीम उप प्रादेशिक परिवहन अधिकारी जालना श्री. चंद्रमोहन चिंतल यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असून, पुढील काही दिवसांत ही कारवाई आणखी तीव्र करण्यात येणार आहे.

नये व प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी वाहतूक नियंत्रण मोहिमेअंतर्गत ऑटो रिक्षा वर कारवाई करण्यात आली बसताना का बाहेर अनाधिकृतपणे उभ्या असलेल्या अनेक रिक्षांची तपासणी करून त्याच्यावर तात्काळ दंडात्मक कारवाई करण्यात आली .





**आज पासून एक तास श्रमदान नगरपरिषद कर्मचाऱ्यांनी चमन ते शनी मंदिर पर्यंत सफाई व कचरा उचलणे व प्रत्येक शुक्रवारी हे श्रमदान करणे आवश्यक म्हणून जिल्हाधिकारी अमिषा मित्तल यांनी त्यांनी सूचना दिल्या स्वच्छता निरीक्षक मंगेश साठे अरुण वानखेडे जवान दिलीप हिवाळे व मनपा कर्मचारी छायाचित्रात दिसत आहे.**

# बालविकास प्राथमिक शाळेत बालदिन उत्साहात साजरा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/कसबा येथील महिला मंडळ जुना जालना संचलित श्रीमती प्रभावतीबाई कोळेश्वर बालविकास प्राथमिक शाळेत शुक्रवार दि. १४ नोव्हेंबर रोजी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती बालदिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. बालदिनाचे औचित्य साधून महिला मंडळ जुना जालनाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या नामफलकाचे बालक मंदिरातील चिमुकल्यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.

प्रारंभी महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. विद्याताई कुलकर्णी यांच्या हस्ते नेहरूजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे महिला मंडळाच्या सचिव सुनंदाताई बदनापूरकर, बालवाडी चिटणीस सौ. विजयाताई बागुल, कार्यकारी सदस्या श्रीमती विजयाताई देशपांडे, सौ सुलभाताई कुलकर्णी, सौ. मनीषाताई कुलकर्णी यांची उपस्थिती होती.

प्रारंभी शाळेतील मुला- मुलींनी





पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याविषयीचे विचार आपल्या भाषणात मांडले. सहशिक्षक निलेश सिंदखेडकर यांनी नेहरूंच्या जीवन चरित्रावर विस्तृत प्रकाश टाकला. कार्यक्रमाचा समारोप अध्यक्षा सौ.विद्याताई कुलकर्णी यांच्या अध्यक्षीय भाषणाने झाला. शेवटी महिला मंडळाच्या सहसचिव सौ. सुषमाताई पायगव्हाणे यांच्यावतीने त्यांचा मुलगा गोपाल ज्ञानदेव पायगव्हाणे यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच बाल दिनानिमित्त शाळेतील उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षिका सौ. पल्लवी सरकटे आणि सहशिक्षिका सौ. वंदना आगळे यांनी केले तर आभार प्रदर्शन सहशिक्षिका सौ. अंजली पाऊलबुद्धे यांनी केले.

कार्यक्रमास शाळेच्या ज्येष्ठ सहशिक्षिका सौ. छाया मुधोळकर यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813